क्रमांक : एलआरएफ २६९५ / १८१ / प्र.क्र.५९०१/ ज-३

**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- १७ मे, २००२.

**विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे आंबिवली, ता. अंधेरी येथील स.नं. १११ डी च्या अभिन्यासातील मोकळ्या मैदानासाठी आरक्षित भूखंड कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रास " क्रिडा संकुल व खेळाचे मैदान" विकसित करणेसाठी मंजूर करणेबाबत.

**ज्ञापन :-**

उपरोक्त विषयासंबंधी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक- ०२ /१११ डी / ३ क /अे -००३१ दि.२७ .२.२००१ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात येते की, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राने मौ. आंबिवली,ता. अंधेरी येथील स.नं. १११- डी च्या अभिन्यासातील त्यांना "कल्याण केंद्राच्या" आरक्षणाखालील मंजूर केलेल्या भूखंडालगतचा "मोकळ्या मैदानासाठी" आरक्षित असलेला अंदाजे ४००० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड क्रीडा संकुल व खेळाचे मैदान विकसित करणेसाठी प्रस्तूत संस्थेस मंजूर करण्याची विनंती केली असल्याने सदर भूखंड क्रीडा संकुल व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ चे नियम ७ तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलआरएफ १०८३/१४९६/प्र.क्र. ३७००/ग-६ दिनांक ११-५-१९८४ मधील तरतुदीनुसार दिनांक १-२-१९७६ च्या किंमतीच्या १०% किंमतीवर भारतीय स्टेट बँकेने निर्धारित केलेल्या **"प्राईम लेंडिंग रेट"** नुसार भाडेपट्ट्याचा दर आकारुन १५ वर्षाच्या कालावधीकरीता नेहमीच्या अटी व शर्ती आणि जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी व खालील विशिष्ट अटींवर मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रश्नाधीन भूखंडावर मुंबई विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय बांधकामाव्यतिरिक्त अन्य बांधकाम करता येणार नाही.

२) प्रश्नाधीन भूखंडाबाबत नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाद्वारे दिनांक १-२-१९७६ चे मुल्यांकन निश्चित करण्यात येईल. व सदर मुल्यांकनानुसार निर्धारित होणारा भाडेपट्टयाचा दर भरण्यास तयार असलेबाबत संस्थेकडून रु. २० च्या स्टँप पेपरवर लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

३) शासन परिपत्रक दिनांक ८-२-१९८३ मध्ये निहित केलेल्या अटी संस्थेवर बंधनकारक राहतील.

४) जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

५) गृहनिर्माण संस्थाच्या संघटनेने त्यांच्या दि.४.७.२००१ रोजीच्या पत्रात जागेवरील आरक्षण बदलण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे त्यामुळे जागेवरील आरक्षण न बदलण्याच्या अटीच्या अधीन राहून संस्थेस जागा मंजूर करण्यात यावी सदरील जागेचा वापर करण्याचा हक्क तेथील रहिवाशांना राहील.त्यासाठी आवश्यक अटी व शर्ती जिल्हाधिकारी यांनी संबंधितांशी चर्चा करुन निश्चित कराव्यात.

Issue to Ramesh 29th to this Kendra

...MAY 2002

Scanned by CamScanner

२. हे ज्ञापन वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक-प्र.क्र.३६१/०२/व्यय-९ दिनांक ३०/४/२००२ च्या सहमतीने निर्गमीत होत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शिवाजी पाटणकर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

**प्रतिलिपी :-**

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त, व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा)
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई
६) कार्यासन अधिकारी, व्यय-९,वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
७) कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
८) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, वांद्रा (पू.) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

क्रमांक :०२/३डी/एल- ६९२
दिनांक : ३०/०५/२००२

वाचले:- १) या कार्यालयाचे पत्र क्र. ०२/१११ डी/३क/3ं-००३१ दि. २७/२/२००१
२) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६९५/१८१/प्र.क्र.५९०९/ज-३ दि.१७/५/२००२.

**आदेश**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राने मोजे आंबिवली , ता. अंधेरी येथील स.नं. १११ डी च्या अभिन्यासातील त्यांना " कल्याण केंद्राच्या" आरक्षणाखालील मंजूर केलेल्या भूखंडालगतच्या "मोकळया मेदानासाठी "आरंक्षित असलेल्या अंदाजे ४००० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड क्रिडा संकुल व खेळाचे मेदान विकसित करण्यासाठी प्रस्तुत संस्थेने मंजुर करण्याची विनंती केलेली असल्याने सदर भूखंड क्रिडा संकुल व खेळाचे मेदान या प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ चे नियम ७ तसेच शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र. एलआरएफ -१०८३/१४९९/प्र.क्र. ३७००/ग-६ दि. ११/५/१९८४ मधील तरतुदीनुसार दि. १/२/७६ च्या किंमतीच्या १०% किंमतीवर भारतीय स्टेट बँकेने निर्धारित केलेल्या प्राईम लॅडींग रेट" नुसार भाडेपट्टयाचा दर आकारुन १५ वर्षाच्या कालावधीकरीता मंजूर जमिनीची प्रचलित बाजारभावाची तात्पुरती किंमत प्रती चौ.मी. २००/- रु. इतकी मानुन या दराप्रमाणे बाजारभावाने होणाऱ्या जमिनीच्या संपुर्ण किमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या १ जानेवारी २००२ रोजी अस्तित्वांत असलेल्या प्राईम लॅडींग रेट प्रमाणे प्रती वर्षी ९,२००/- रु ( रुपये नऊ हजार दोनशे मात्र) भाडेपट्टा आकारुन नेहमीच्या अटी/शर्ती तसेच खालील अतिरिक्त अटींवर देण्यास उद्देशिकेत अनु.२ वर नमुद केलेल्या शासन ज्ञापनाच्या अधिन राहून मंजूरी देण्यांत येत आहे.

१) प्रश्नाधिन भूखंडावर मुंबई विकास नियत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय बांधकामाव्यतिरिक्त अन्य बांधकाम करता येणार नाही.
२) प्रश्नाधिन भूखंडाबावत नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाद्वारे दि. १/२/१९७६ चे मुल्यांकन निश्चित करण्यांत येईल. व सदर मुल्यांकनानुसार निर्धारीत होणारी अंतिम मुल्यांकनाची रक्कम तात्पुरत्या मुल्यांकनापेक्षा जास्त भरल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह या कार्यालयाने कळविल्यानंतर एक महिन्याच्या आत भरण्याबाबत रु. २०/- च्या मुद्रांकित पेपरवर हमीपत्र या कार्यालयास सादर करावे.
३) भाडेपट्टयाच्या दरात दर १० वर्षांनी सुधारणा करणेत येईल.
४) जागेवरील आरक्षणांत बदल करता येणार नाही. सदर जागेचा वापर करण्याचा हक्क तेथील रहिवाश्यांना राहिल.
५) सदर संस्था सर्व जाती धर्मांच्या व्यक्तीसाठी खुली असली पाहिजे.
६) संस्थेला जागेचा वापर क्रिडा संकुल व खेळाचे मेदान विकसित करण्याच्या प्रयोजना व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता करता येणार नाही.
७) जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या सरकारी अधिकारी यांना केंव्हाही जमिनीच्या उक्त भागात प्रवेश करुन त्याचे निरीक्षण करण्यास परवानगी देण्यास संस्था बंधनकारक राहील.
८) भाडेपट्टयाने देण्यात आलेली जमिन अथवा कोणसही गहाण,दान, हस्तांतरण व त्रयस्थ हक्कदार अथवा खरेदी व्यवहाराने प्रदान करता येणार नाही. तसे केल्यास शासन निर्णय दिनांक ८/९/१९८३ नुसार ७५% अर्जीत उत्पन्न संस्थेस शासनाकडे जमा करावे लागेल.
९) भाडेपट्टा जागेवर कोणताही बदल करावयाचा झाल्यास त्याबाबत शासनाची /जिल्हाधिकारी यांचा परवानगी घ्यावी लागेल. जमिनीवरील इमारत आराखडा महानगरपालिकेकडून मंजुर केल्याशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

Scanned by CamScanner

१०) सदरची जमिन शासनास अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असेल त्यापैकी एक महिन्याच्या नोटीशीने सदरची जागा सरकार जमा करणेत येईल . याबाबत नुकसान भरपाई अथवा कोणताही दावा करता येणार नाही.

११) शासनाचे धोरणानुसार भाडेपट्टयामध्ये वाढ झाल्यास जादा भाडेपट्टा भरणेस संस्था जबाबदार राहील.

१२) करारनामा विधी व न्याय विभाग यांचेकडून करुन घेणेत येईल. त्याबाबतची फी रु. १७००/- रु. या कार्यालयात जमा करणेत यावेत.

१३) संस्थेला ज्या प्रयोजनार्थ जमिन मंजुर करण्यांत आली आहे त्याच प्रयोजनासाठी जमीन वापरता येईल.

१४) भविष्यकाळात जिल्हाधिकारी यांना काही नविन अटींचा समावेश करणे आवश्यक वाटल्यास त्या अटींचा समावेश करण्याचे स्वातंत्र्य जिल्हाधिकारी यांना राहील व त्या अटी मान्य करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१५) जमिनीवरील क्रिडा संकूलाचे बांधकाम ताबा मिळाल्यापासून तीन वर्षात पुर्ण करणे बंधनकारक आहे.

१६) भाडेपट्टेदाराने ताबा मिळालेपासून दोन वर्षात किमान एक झाड प्रती १०० चो.मी. लावणे व त्याची जोपासना करणे बंधनकारक आहे.

१७) जमिनीवरील खनिज व गौण खनिजाचे हक्क शासनाचे राहतील.

१८) भाडेपट्टेदाराने जिल्हाधिकारी यांचेकडे कायमस्वरुपी डिपॉझिट म्हणून रु. १०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) भरणे आवश्यक आहे.

१९) भाडेपट्टेदाराने कोणत्याही शर्तीचा भंग केल्याचे आढळल्यास कोणतीही नुकसान भरपाई न देता जमिन व त्यावरील इमारत पुनर्ग्रहित करणेचे अधिकार शासन/ जिल्हाधिकारी यांना राहतील. सदरचे आदेश पारीत झाल्यापासून जमीन सर्व भार रहित मोकळा ताबा शासन /जिल्हाधिकारी यांना आदेशात नमूद केलेल्या कालावधीत देणे बंधनकारक राहील.

२०) संकल्पीत बांधकामाचा प्रकल्पाचा सविस्तर तपशिल संस्थेने तात्काळ जिल्हाधिकारी यांना देणेचे अटीवर हे आदेश पारीत करणेत येत आहे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

स्वाक्षरीवर . . जिल्हाधिकारी
यांची सही मध्ये

प्रति,
अध्यक्ष,
कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जमशेटजी भवन,
पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड मार्ग,
(आर.टी.ओ कॉर्नर) चार बंगला,
अंधेरी (प) मुंबई ४०० ०५३

प्रती,

१) मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र. एलआरएफ -२६९५/१८१/प्र.क्र. ५९०९/ज-३ दि. १७/५/२००२ चे संदर्भात माहितीसाठी सविनय सादर.

२/- उपरोक्त शासन ज्ञापनामध्ये शासनाने दिनांक १/२/१९७६ च्या किंमतीच्या १०% किंमतीवर भारतीय स्टेट बँकेने निर्धारित केलेल्या "प्राईम लँडींग रेट" नुसार भाडेपट्टयाच्या दर आकारण्याचे निर्देश दिलेत. परंतू प्राईम लँडींग रेट हा चालू वर्षाचा घ्यावा किंवा कसे? याबाबत निर्देशित केलेले नाही. सबब, दिनांक १/१/२००२ चा प्राईम लँडींग रेट" ११.५० नुसार भाडेपट्टा आकारणेत आलेला आहे. तरी याबाबत शासन स्तरावरुन कार्योत्तर मंजूरी होणेस विनंती आहे.

तहसिलदार अंधेरी व नगर भूमापन अधिकारी अंधेरी यांजकडे माहितीसाठी रवाना.

स्वाक्षरीवर . . जिल्हाधिकारी
यांची सही मध्ये

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

Scanned by CamScanner

क्रमांक : एल.आर.एफ. २६९५/१८१/प्र.क्र.५९०९ /ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- ७ ऑगस्ट २००२

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौ. आंबिवली, ता. अंधेरी, येथील स.नं. १११ - डी च्या
अभिन्यासातील मोकळया मैदानासाठी आरक्षित भूखंड
कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रास
"क्रिडा संकुल व खेळाचे मैदान " या प्रयोजनासाठी
विकसित करण्यासाठी मंजूर करणेबाबत.

वाचा :- समक्रमांक दिनांक १७.५.२००२ चे शासन ज्ञापन.

**शुध्दिपत्रक:-**

उपरोक्त विषयासंबंधी समक्रमांक दिनांक १७.५.२००२ च्या शासन ज्ञापनामधील "मोकळया मैदानासाठी आरक्षित असलेला अंदाजे ४००० चौ.मी क्षेत्राचा भूखंड " याऐवजी " "मोकळया मैदानासाठी आरक्षित असलेला ५५७२ चौ.मी. ( मोजणीनुसार ) क्षेत्राचा भूखंड" याप्रमाणे सुधारणा करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(शिवाजी पाटणकर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, बांद्रा (पुर्व)
मुंबई - ५१.

**प्रतिलिपी :-**

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त, व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा)
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई
६) कार्यासन अधिकारी, व्यय-९, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

ORDER % J-3.lmp/216

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक :- AUG 2002
बाबत :

4161

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, वांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


क्रमांक :०२/३डी/एल ६१३
दिनांक :९/१०/२००२

वाचले:- १) शासन , महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६९५/१८१/प्र.क्र.५९०९/ज-३ दि.१७/५/२००२
२) या कार्यालयाचे आदेश क्र. ०२/३डी/एल-६१३, दि. ३०/५/२००२
३) शासन महसूल व वन विभागाकडील शुध्दीपत्रक क्र. एलआरएफ-२६९५/१८१/प्र.क्र.५९०९/ ज-३ दि. ७/८/२००२

## शुध्दीपत्रक

उद्देशिकेतील अनुक्रमांक १ व २ नुसार , कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रास, मौजे आंबिवली, तालुका अंधेरी, स.नं. १११ डी च्या अभिन्यासातील मोकळया मैदानासाठी आरक्षित असलेला अंदाजे ४००० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड " क्रिडा संकुल व खेळाचे मैदान " या प्रयोजनासाठी विकसीत करण्यासाठी भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आला. तथापी संपूर्ण मोकळया भूखंडासाठी आरक्षित असलेल्या भुखंडाचे मोजणीनुसार क्षेत्र ५५७२ चौ.मी. इतके असल्यामुळे उद्देशिकेतील अनु.३ नुसार भूखंडाचे क्षेत्रात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

| "वाचले" | "ऐवजी" |
|---|---|
| मोकळया मैदानासाठी आरक्षित असलेला ५५७२ चौ.मी. (मोजणी नुसार) क्षेत्राचा भुखंड | मोकळया मैदानासाठी आरक्षित अंदाजे ४००० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड |

प्रकरणी सुधारीत क्षेत्राप्रमाणे वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु. ११,५००/- ( रुपये अकरा हजार पाचशे मात्र) इतकी येत आहे. तरी भाडेपट्टा फरकाची रक्कम रु. २,३००/-( रुपये दोन हजार तिनशे मात्र) त्वरीत या कार्यालयाकडे भरणा करावी

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

स्वाक्षरीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

प्रति,
अध्यक्ष,
कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी भवन,
पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड मार्ग,
( आर.टी. ओ कॉर्नर) चार बंगला,
अंधेरी (प) मुंबई ४०० ०५३

प्रती:-
१) मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, यांचेकडील शुध्दीपत्रक क्र. एलआरएफ-२६९५/१८१/प्र.क्र.५९०९/ज-३ दि. ७/८/२००२ चे संदर्भात माहितीसाठी सविनय सादर.
२) तहसिलदार अंधेरी व नगर भूमापन अधिकारी अंधेरी यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

स्वाक्षरीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

Scanned by CamScanner